कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगांव ता. जि. लातूर.

# बहिशाल शिक्षण केंद्र

शैक्षणिक वर्ष 2025-26 अहवाल

महाविद्‌यालयाचे प्राचार्य डॉ दुष्यंत कटारे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 29 डिसेंबर 2025 रोजी बहि:शाल शिक्षण केंद्राची बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये बहिशाल व्याख्यानमालेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून कृषी महाविद्‌यालय लातूरचे अधिष्ठाता डॉ बाबासाहेब ठोंबरे यांना निमंत्रित करण्याचे सर्वानुमते ठरले.

महाविद्‌यालयाच्या बहिशाल शिक्षण केंद्राच्या वतीने दिनांक 20 जानेवारी 2026 रोजी सायंकाळी ठीक सात वाजता साखरा ता जि लातूर येथे कृषी महाविद्‌यालय, लातूर येथील अधिष्ठाता डॉ बाबासाहेब ठोंबरे यांचे ‘कृषी विकासातील दिशा: काल, आज आणि उद्‌या‘ या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ दुष्यंत कटारे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ माधव गायकवाड, प्रास्ताविक डॉ रणजीत जाधव तर आभार डॉ सुरेश कुमार कांबळे यांनी मांडले. या कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रो. रणजित जाधव
प्रभारी

प्राचार्य
कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय,
बाभळगांव,ता.जि.लातूर

(१)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगाव द्वारा संचलित

# कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय बाभळगाव,

ता. जि लातूर

# बहिःशाल शिक्षण केंद्र व्याख्यान कार्यक्रम

## विषय :- 'कृषि विकासातील दिशा: काल, आज आणि उद्या'

: प्रमुख व्याख्याते :

**डॉ. बाबासाहेब ठोंबरे**

अधिष्ठता, कृषि महाविद्यालय, लातूर

: अध्यक्ष :

**डॉ. दुष्यंत कटारे**

प्राचार्य कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव ता. जि. लातूर

: विनीत :

प्रो. रणजित जाधव, डॉ. माधव गायकवाड

डॉ. नरेंद्र देशमुख, प्रा. चंद्रकांत मोरे

( बहिःशाल शिक्षण केंद्र, कै.व्यं.दे.म. बाभळगाव, ता. जि लातूर)

मंगळवार

दि. २०/०१/२०२६

: स्थळ :

साखरा ता जि लातूर

: वेळ :

सायं ७ वाजता

नवराष्ट्र Latur | 23 January 2026 | Page 4

विचार ● बहिःशाल शिक्षण केंद्रात डॉ. ठोंबरे यांचे मार्गदर्शन

## कृषी विकासाची दिशा उलगडली

### साखरा येथील शिबिरात शेतकऱ्यांना दिले सल्ले



▶ लातूर, शहर प्रतिनिधी. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्न दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगावद्वारे संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव यांच्या वतीने साखरा (ता. लातूर) येथे बहिःशाल शिक्षण केंद्राच्या माध्यमातून 'कृषी विकासातील दिशा : काल, आज आणि उद्या' या विषयावर कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी मार्गदर्शन केले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते. डॉ. ठोंबरे यांनी भारतीय कृषी व्यवस्थेचा ऐतिहासिक प्रवास मांडताना पारंपरिक शेतीपद्धती, स्वावलंबी ग्रामीण अर्थव्यवस्था आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा समतोल वापर यांचे महत्त्व स्पष्ट केले. हरितक्रांतीनंतर उत्पादनात झालेल्या वाढीबरोबरच रासायनिक खतांचा अति वापर, मातीची सुपीकता घटणे, पाण्याची वाढती टंचाई आणि शेतकऱ्यांसमोरील आर्थिक अडचणी यावरही त्यांनी सविस्तर प्रकाश टाकला.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी भविष्यातील कृषी विकासासाठी शाश्वत शेती, सेंद्रिय शेती, सूक्ष्म सिंचन, कृषी प्रक्रिया उद्योग आणि कृषी आधारित उद्योगधंद्यांचे महत्त्व विशद केले. युवकांनी शेतीकडे उद्योजकतेच्या संधी म्हणून पाहावे, असे आवाहन डॉ. ठोंबरे यांनी केले.

### मान्यवरांची उपस्थिती

उपसरपंच तुकाराम गोडसे, शिलरत्न माने, प्रा. चंद्रकांत मोरे, डॉ. नरेंद्र देशमुख, डॉ. अजित भाजी, अंगद कोते, दशरथ भिसे, अभिजित बादाडे, डॉ. नाना जाधव, डॉ. मीनाक्षी कोगे उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. रणजीत जाधव यानी केले. सूत्रसंचालन डॉ. मा. ना. गायकवाड यानी तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सुरेशकुमार कांबळे यांनी मानले.

### या मुद्द्यांवर करण्यात आले विचारमंथन

- पारंपरिक व आधुनिक शेतीपद्धतींचे सखोल विश्लेषण
- हरितक्रांतीनंतरच्या आव्हानांवर स्पष्ट मांडणी
- शाश्वत व सेंद्रिय शेतीकडे वाटचालीचा संदेश
- युवकांसाठी कृषी क्षेत्रात उद्योजकतेच्या संधी

लोकमत

## साखरा येथे बहिःशाल शिक्षण केंद्राचा कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

लातूर : तालुक्यातील बाभळगाव येथील व्यंकटराव देशमुख महाविद्यालयाच्या बहिःशाल शिक्षण केंद्राच्या वतीने लातूर तालुक्यातील साखरा येथे 'कृषी विकासातील दिशा : काल, आज आणि उद्या' या विषयावर डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते.

Hello Latur
Page No. 2 Jan 23, 2026
Powered by: erelego.com



प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांच्या सत्कार प्रसंगी




प्रमुख पाहुणे डॉ. बाबासाहेब ठोंबरे मार्गदर्शन करताना।

③




कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना प्रा. डॉ. रणजित जाधव




अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य
डॉ. दुष्यंत कटारे.




बहि:शाल शिक्षण केंद्र व्याख्यान कार्यक्रमाचे सूत्रसंचलन करताना प्रा. डॉ. माधव गायकवाड दि. २०.०१.२०२६



कार्यक्रमास उपस्थित ग्रामस्थ व विद्यार्थी



आभार व्यक्त करताना प्रा. डॉ. सुरेशकुमार कांबळे

